RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक २१(२)] मंगळवार, ऑक्टोबर १५, २०२४/आश्विन २३, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.—** महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. | **पृष्ठे** १-३ |

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIV OF 2024.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION OF HOLDINGS ACT.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**

**महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९४७ चा **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास
६२. प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी

महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ६२ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (३) मधील, पहिल्या परंतुकातील,— १९४७ चा ६२.

(१) "महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; २०१७ चा महा. ५८. २०२४ चा महा. अध्या. १४.

(२) "वार्षिक दर विवरणपत्रानुसार, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा शासन, राजपत्रात वेळोवेळी अधिसूचित करील अशा प्रमाणातील" या मजकुराऐवजी, "वार्षिक दर विवरणपत्रानुसार, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या पाच टक्के इतके" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन

१५ नोव्हेंबर, १९६५ पासून सुरू होणाऱ्या ते महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ५८) याच्या, प्रारंभाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम (१९४७ चा ६२) याच्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेले जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन, शासन, शासकीय राजपत्रात, वेळोवेळी अधिसूचित करील अशा वार्षिक दर विवरणपत्रानुसार, अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा प्रमाणातील नियमाधीनकरण अधिमूल्य प्रदान करून, नियमाधीन करण्यासाठी उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने, वार्षिक दर विवरणपत्रानुसार, जमिनीच्या बाजार मूल्याच्या २५ टक्के इतके नियमाधीनकरण अधिमूल्य अधिसूचित केले आहे. उक्त सुधारणेचे प्रयोजन असे आहे की, अशा तुकड्यांचे भोगवटादार, त्यांचा परवानगीयोग्य वापर सुरू करू शकतील आणि वापरात नसलेले असे असंख्य तुकडे, पुन्हा उत्पादक वापरामध्ये आणता येऊ शकतील, त्यामुळे आर्थिक विकासामध्ये योगदान देता येईल.

अशा नियमाधीनकरणास, लोकांचा अल्प प्रतिसाद मिळत आहे असे निदर्शनास आले आहे. उच्च नियमाधीनकरण अधिमूल्यामुळे अशा हस्तांतरणाचे नियमाधीनकरण करण्यास कमी प्रतिसाद मिळत आहे अशी संभाव्यता देखील असू शकेल असे शासनाचे मत आहे.

२. महसुलाशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी आणि आवश्यक असल्यास, त्यामध्ये सुधारणा करण्याची शिफारस करण्यासाठी शासनाने, श्री. उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित केली होती. उक्त समितीने, उक्त नियमाधीनकरण अधिमूल्य, जमिनीच्या बाजार मूल्याच्या दहा टक्के इतके कमी करण्याची शिफारस केली आहे.

उक्त सुधारणेची वर निर्दिष्ट केलेली प्रयोजने साध्य करण्याच्या दृष्टीने, या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या तारखेपर्यंतच्या, जमिनीच्या अशा हस्तांतरणाचे किंवा विभाजनाचे नियमाधीनकरण करण्यास परवानगी देणे आणि नियमाधीनकरण अधिमूल्य कमी करणे आणि ते या अधिनियमामध्ये, अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या ५ टक्के इतके निश्चित करणे इष्ट आहे असे वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १५ ऑक्टोबर २०२४.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.